लोकमत



अ. रा. कुलकर्णी व्याख्यानमालेत डॉ. सुमित्रा कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. दत्तात्रय मचाले, डॉ. नंदा पारेकर, डॉ. अवनीश पाटील उपस्थित होते.

# नागरीकरणात बाजारपेठांची भूमिका महत्त्वाची : कुलकर्णी

## विद्यापीठात अ. रा. स्मृती व्याख्यानमाला

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** सतराव्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली आणि त्यामुळे महाराष्ट्रातील सामान्य लोकांच्या जीवनात महत्त्वाचे बदल झाले. या काळात महाराष्ट्राच्या नागरीकरणात कसबा, पेठा, छोट्या बाजारपेठांनी महत्त्वाची भूमिका निभावली, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील माजी इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. सुमित्रा कुलकर्णी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ इतिहास अधिविभाग आयोजित इतिहास परिषदेच्या रौप्यमहोत्सवी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशीच्या प्रथम सत्रात "प्रा. डॉ. अ. रा. कुलकर्णी स्मृती व्याख्यानमालेत" प्रा. डॉ. कुलकर्णी यांनी पुष्प गुंफले. अध्यक्षस्थानी डॉ. नंदा पारेकर होत्या. कुलकर्णी म्हणाल्या, मराठा काळात वाई, रहिमतपूर, कोल्हापूर, कऱ्हाड इ. ठिकाणी कसब्यांची निर्मिती झाली. पुढे याचेच रूपांतर छोट्या शहरांमध्ये झाले. बाजीरावाच्या काळात या बाजारपेठांना उतरती कळा लागली. यावेळी डॉ. नंदा पारेकर यांनी मार्गदर्शन केले. इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी स्वागत केले. डॉ. दत्तात्रय मचाले यांनी आभार मानले. यावेळी डॉ. अरुण भोसले, डॉ. एम. ए. लोहार, प्राचार्य व्ही. एन. व्हनमाने, प्राचार्य विलास पोवार, प्राचार्य एस. एस. पाटील, प्राचार्य इस्माईल पठाण, आदी उपस्थित होते.

15 JUN 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महाराष्ट्राच्या नागरीकरणामध्ये कसबा, बाजारपेठांची भूमिका महत्त्वाची

## डॉ. सुमित्रा कुलकर्णी; इतिहास परिषदेतर्फे व्याख्यानमाला

कोल्हापूर, ता. १४ : नागरीकरण ही एक अखंड चालणारी प्रक्रिया आहे. सतराव्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली. त्यामुळे महाराष्ट्रातील सामान्य लोकांच्या जीवनात महत्त्वाचे बदल झाले. या काळात महाराष्ट्राच्या नागरीकरणात कसबा, पेठा, छोट्या बाजारपेठांनी महत्त्वाची भूमिका निभावली, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील माजी इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. सुमित्रा कुलकर्णी यांनी केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषदेतर्फे आयोजित व्याख्यानमालेत बोलताना प्रा. डॉ. सुमित्रा कुलकर्णी. शेजारी दत्तात्रय मचाले, नंदा पारेकर, अवनिश पाटील.

शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषदेच्या रौप्यमहोत्सवी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशीच्या प्रथम सत्रातील प्रा. डॉ. अ. रा. कुलकर्णी स्मृती व्याख्यानमालेत त्यांनी पुष्प गुंफले. त्यांनी 'मराठेकालीन महाराष्ट्रातील नागरीकरण' या विषयावर मांडणी केली.

अध्यक्षीय समारोपात डॉ. नंदा पारेकर यांनी प्राचीन काळातील नागरीकरणाच्या प्रक्रियेपासून आधुनिक काळातील नागरीकरणाच्या प्रक्रियेमधील नवीन आयामावर प्रकाश टाकला. डॉ. अरुण भोसले, एम. ए. लोहार, व्ही. एन. व्हनमाने, विलास पोवार, एस. एस. पाटील, इस्माईल पठाण, अंकुश बेलवटकर, निलांबरी जगताप, आदी उपस्थित होते. इतिहास अधिविभागाचे विभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी प्रास्ताविक केले. दत्तात्रय मचाले यांनी आभार मानले.

14 JUN 2023 महासत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उद्योगक्षेत्र आणि शिक्षण व्यवस्था एकत्र येणे आवश्यक

## डॉ.उदय निरगुडकर; शिवाजी विद्यापीठात परिसंवाद

कोल्हापूर,ता.१३(प्रतिनिधी)-

**भारत देशाला विश्वगुरू बनविण्यासाठी उद्योगक्षेत्र आणि शिक्षण व्यवस्था एकत्र येणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन भारत सरकारच्या नॅशनल हायड्रो इलेक्ट्रीक पॉवर कार्पोरेशन प्रा.लिमिटेडचे स्वतंत्र संचालक डॉ.उदय निरगुडकर यांनी केले.**

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यापीठ व उद्योग संवाद केंद्राच्या वतीने 'युनिव्हर्सिटी-इंडस्ट्री लिंकेजिस एम्प्लॉएबिलिटी अँड आंत्रप्रिन्युअरशीप डेव्हलपमेंट' या विषयावर विद्यापीठ-उद्योग संवादवृद्धीच्या अनुषंगाने महत्वपूर्ण विशेष परिसंवादाचे आयोजन विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये करण्यात आले होते. या परिसंवादाच्या उद्घाटनपर भाषणामध्ये डॉ.उदय निरगुडकर बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.दिगंबर शिर्के उपस्थित होते.

डॉ. निरगुडकर पुढे बोलताना म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरणामध्ये संपूर्ण धडा उद्योग आणि शैक्षणिक संबंधांवर आधारीत आहे. उद्योग क्षेत्र आणि शिक्षण व्यवस्थेमधील वाढलेली दरी कमी करण्यासाठी विशेष प्रयत्न होणे आवश्यक आहे.

अध्यक्षीय मनोगतामध्ये कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी या वर्षापासून सुरू झालेली आहे. ती पहिल्यांदा पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी सुरू होत आहे. अद्यावत तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी स्थानिक समस्यांबरोबरच जागतिक समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील रहावे. राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य सिध्दार्थ शिंदे यांनी परिसंवादाची उद्दिष्टे विषद केली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ.प्रमोद पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले.

विद्यापीठ व उद्योग संवाद केंद्राचे समन्वयक डॉ.सागर डेळेकर यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. तंत्रज्ञान अधिविभाग प्रमुख डॉ.शिवलिंगप्पा सपली यांनी आभार मानले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ.विलास शिंदे यांच्यासह डॉ.महादेव देशमुख, डॉ.श्रीकृष्ण महाजन, डॉ.सरिता ठकार, विविध अधिविभागांचे प्रमुख, संशोधक विद्यार्थी, विद्यार्थीनी, उद्योग-व्यवसायप्रेमी जनता मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुण्यनगरी

# विदेशी भाषा अभ्यासक्रम प्रवेश आजपासून

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा अधिविभागातील प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीची प्रक्रिया दि. १५ जूनपासून सुरू होत असून, ऑफलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. यासाठी शैक्षणिक पात्रता बारावी किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असणारे विद्यार्थी एक वर्ष कालावधीच्या रशियन, जर्मन, जपानी, फ्रेंच, पोर्तुगीज या प्रमाणपत्र अभ्यासक्रमासांठी अर्ज करू शकतात. याकरिता टी.सी. किंवा एम.सी.ची आवश्यकता नाही. सोमवार ते शुक्रवार दररोज एक तास सायंकाळी चार नंतर अभ्यासक्रम शिकविले जाणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
15 JUN 2023 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पदवी अभ्यासक्रमांचे वर्ग ३ जुलैपासून

## शिवाजी विद्यापीठाकडून सत्रारंभ जाहीर; महाविद्यालयांना सूचना

कोल्हापूर, ता. १४ : शिवाजी विद्यापीठातील अधिविभाग आणि संलग्नित महाविद्यालयांमधील कला, वाणिज्य, विज्ञान, सामाजिकशास्त्रे, आदी पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे वर्ग ३ जुलैपासून भरणार आहेत. यंदाच्या शैक्षणिक वर्षातील पहिल्या सत्रारंभाची सुरूवात त्यादिवसापासून होणार असल्याचे विद्यापीठाने जाहीर केले आहे. त्याबाबतची सूचना कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील महाविद्यालयांना प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आज परिपत्रकाद्वारे केली.

ललितकला, वाणिज्य व व्यवस्थापन, समाजकार्य, शिक्षणशास्त्र, विधी पदवी, अभियांत्रिकी, टेक्सटाईल, वास्तुशास्त्र, फार्मसी, आंतरविद्याशाखीय आणि अभ्यास केंद्राअंतर्गत अभ्यासक्रमाच्या पहिल्या आणि दुसऱ्या सत्राचा प्रारंभ आणि त्याच्या समाप्तीच्या तारखा विद्यापीठाने जाहीर केल्या आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अधिसूचनेनुसार सत्रारंभ आणि सत्रसमाप्तीच्या तारखेमध्ये विद्यार्थी प्रवेश, परीक्षांचा प्राथमिक कालावधी अंतर्भूत आहे.

सत्रारंभाच्या दिवशी महाविद्यालयाची साप्ताहिक सुटी येत असल्यास त्याच्या दुसऱ्यादिवशी सत्रारंभ करावा, अशी सूचना डॉ. शिंदे यांनी केली आहे.

### ‘पीएच.डी. कोर्सवर्क’ परीक्षा अर्ज २३ जूनपासून भरा

■ मार्च-एप्रिल २०२३ सत्रातील एम. फिल., प्री-पीएच.डी. कोर्सवर्कच्या परीक्षेचे अर्ज भरण्याची प्रक्रिया २३ जूनपासून सुरू होणार आहे. या परीक्षा २४ जुलैपासून सुरू होतील. दरम्यान, विद्यापीठातर्फे आज विविध १९ अभ्यासक्रमांची पदवी परीक्षा घेण्यात आली. त्यासाठी ५९४९ विद्यार्थी उपस्थित होते. या परीक्षेच्या कालावधीत भरारी पथकांनी कॉपी करणाऱ्या १० विद्यार्थ्यांना पकडले. त्यात सातारा जिल्ह्यातील ९, तर सांगली जिल्ह्यातील एका विद्यार्थ्याचा समावेश आहे. परीक्षा व मूल्यमापन मंडळाने विविध १२ अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल जाहीर केले.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाचे नवे सत्र ३ जुलैपासून सुरू

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे नव्या वर्षातील शैक्षणिक सत्र ३ जुलैपासून सुरू होत असल्याची माहिती शिवाजी विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली आहे. पदवी अभ्यासक्रम शिकवणाऱ्या महाविद्यालयातील कला, वाणिज्य व सामाजिकशास्त्र विद्याशाखांचे वर्ग ३ जुलैपासून सुरू होणार असून, विद्यापीठातील सर्व अधिविभाग व महाविद्यालयातील पदव्युत्तर विभाग ४ जुलैपासून सुरू होणार आहेत.

व्यवस्थापन विभागातील अभ्यासक्रम १ जुलैपासून सुरू करण्याचा निर्णय विद्यापीठ प्रशासनाने घेतला आहे, तर अभियांत्रिकी विभागातील पदवी अभ्यासक्रमांचे वर्ग १० ते १४ जुलैपासून सुरू होणार आहेत. यामध्ये टेक्स्टाइल व वास्तुशास्त्र विभागांचा समावेश आहे. विधी महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम १० जुलैपासून, तर विधी अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाचे वर्ग ३० जुलैपासून सुरू होणार आहेत. फार्मसी विभागाचे वर्ग १४ ते २२ जुलै या काळात टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात येणार आहेत. शिक्षणशास्त्र विभागाचे पदवीचे वर्ग ३ जुलै तर पदव्युत्तरचे वर्ग १० जुलैपासून सुरू होणार आहेत.

पुढारी

# विद्यापीठाच्या नव्या सत्राला ३ जुलैपासून प्रारंभ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या नव्या सत्राला ३ जुलैपासून प्रारंभ होणार आहे. विद्यापीठाने बुधवारी विविध शाखांच्या या वर्षाच्या पहिल्या आणि दुसऱ्या सत्रातील तारखा जाहीर केल्या. त्यानुसार कोल्हापूरसह सांगली व सातारा जिल्ह्यातील वरिष्ठ महाविद्यालयेही सुरू होणार आहेत. पदवी अभ्यासक्रमाच्या कला, वाणिज्य, विज्ञान आणि सामाजिक शास्त्रे शाखांचे पहिले सत्र ३ जुलै ते दि.११ नोव्हेंबर असे, तर २४ नोव्हेंबर ते ९ मे २०२४ असे दुसरे सत्र असेल. विद्यापीठातील अधिविभागांचे पहिले सत्र ४ जुलै ते ११ नोव्हेंबर असे तर २४ नोव्हेंबर ते ९ मे २०२४ असे दुसरे सत्र राहणार आहे. एम.बी.ए. व एमसीएचे पहिले सत्र १ ऑगस्ट रोजी, एमएसडब्ल्यू पदव्युत्तरचे सत्र १० जुलै रोजी सुरू होईल. विधी विभागाचे पहिले सत्र ३० ऑगस्टपासून सुरू होईल. अभियांत्रिकीचे पहिले सत्र १४ ऑगस्टपासून सुरू होईल, असेही विद्यापीठाने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

लोकसत्ता

# शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद अध्यक्षपदी डॉ. अवनीश पाटील

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषदेचे रौप्यमहोत्सवी अधिवेशन इतिहास अधिविभागात पार पडले. यावेळी झालेल्या सर्वसाधारण सभेत २०२३ - २६ कालावधीसाठी परिषदेची नवीन कार्यकारिणी जाहीर झाली.

ती याप्रमाणे - डॉ. अवनीश पाटील - अध्यक्ष , प्रा. सतीश चौगुले इ उपाध्यक्ष, डॉ. धीरज शिंदे - सचिव , डॉ. संतोष जेठीथोर इ खजिनदार, डॉ. दत्तात्रय मचाले इ सहकार्यवाह, डॉ. चंद्रवदन नाईक - पदसिद्ध सदस्य, प्राचार्य सुरेश चव्हाण, डॉ. तानाजी हवालदार, डॉ. भीमाशंकर बिराजदार, प्रा. अप्पासाहेब केंगार, डॉ. संदिप जाधव, डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. उर्मिला क्षीरसागर इ सर्व सदस्य

सकाळ

# शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद अध्यक्षपदी डॉ. अवनीश पाटील

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १४ : शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषदेची सन २०२३ ते २०२६ या कालवधीसाठीची नवीन कार्यकारिणी या परिषदेच्या रौप्यमहोत्सवी अधिवेशनात ११ जूनला जाहीर करण्यात आली. त्यात अध्यक्षपदी डॉ. अवनीश पाटील यांची, तर उपाध्यक्षपदी प्रा. सतीश चौगुले यांची निवड करण्यात आली.

डॉ. पाटील सध्या विद्यापीठातील इतिहास अधिविभागप्रमुखपदी कार्यरत आहेत. प्रा. चौगुले हे वाळवा (जि. सांगली) येथील क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालयातील इतिहास विभागात कार्यरत आहेत. या कार्यकारिणीमध्ये डॉ. धीरज शिंदे (सचिव), संतोष जेठीथोर (खजिनदार), दत्तात्रय मचाले (सहकार्यवाह), चंद्रवदन नाईक (पदसिद्ध सदस्य), प्राचार्य सुरेश चव्हाण, डॉ. तानाजी हवालदार, भीमाशंकर बिराजदार, प्रा. अप्पासाहेब केंगार, डॉ. संदीप जाधव, सुवर्णा पाटील, उर्मिला क्षीरसागर(सदस्य) यांचा समावेश आहे.



**डॉ. अवनीश पाटील**

लोकमत

# डॉ. पाटील इतिहास परिषदेचे अध्यक्ष

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषदेच्या अध्यक्षपदी डॉ. अवनीश पाटील यांची निवड करण्यात



आली. परिषदेच्या रौप्य महोत्सवी अधिवेशनावेळी सर्वसाधारण सभा झाली. यात २०२३ ते २०२६ या कालावधीसाठी नवीन कार्यकारिणी जाहीर झाली. प्रा. सतीश चौगुले यांची उपाध्यक्षपदी, डॉ. धीरज शिंदे यांची सचिव, डॉ. संतोष जेठीथोर यांची खजिनदारपदी, तर डॉ. दत्तात्रय मचाले यांची सहकार्यवाहपदी निवड झाली. डॉ. चंद्रवदन नाईक हे पदसिद्ध सदस्य असतील. प्राचार्य सुरेश चव्हाण, डॉ. तानाजी हवालदार, डॉ. भीमाशंकर बिराजदार, प्रा. अप्पासाहेब केंगार, डॉ. संदीप जाधव, डॉ. सुवर्णा पाटील यांची सदस्यपदी निवड केली.

तरुण भारत

# एम. फिल., पीएच. डी. कोर्स वर्क परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखा जाहीर

## विद्यापीठाच्या संकेतस्थळावर माहिती उपलब्ध

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत मार्च–एप्रिल २०२३ सत्रातील एम. फिल. पीएच. डी. कोर्सवर्क अभ्यासक्रमांचे परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात अथवा पदव्युत्तर अधिविभागामध्ये २३ जून ते ३ जुलैपर्यंत विनाविलंब शुल्कासह १ हजार १६५ रूपये भरून अर्ज भरावयाचा आहे.

५ ते ७ जुलै या कालावधीत विलंब शुल्कासह १ हजार १६५ अधिक दिलेल्या मुदतीत प्रतिदिन ५० रूपये भरावयाचे आहेत. तसेच अतिविलंब शुल्कासह ९ ते १२ जुलै या कालावधीत १ हजार १६५ अधिक दिलेल्या मुदतीत प्रतिदिन ५० अधिक ३०० रूपये भरावयाचे आहेत. यासंदर्भातील सर्व माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, याची दखल महाविद्यालय, अधिविभाग आणि विद्यार्थ्यांनी घ्यावी, असे आवाहन परीक्षा विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.



महाविद्यालय अथवा पदव्युत्तर अधिविभागाने परीक्षा अर्ज विनाविलंब शुल्कासह ४ जुलै रोजी ॲप्रु करावा. विलंब शुल्कासह ८ जूलै रोजी ॲप्रु करावा. अतिविलंब शुल्कासह १३ जुलैपर्यंत ॲप्रुव करावा. महाविद्यालयाने विद्यापीठामध्ये परीक्षा अर्जांच्या याद्या विनाविलंब शुल्कासह ६ जुलैपर्यंत सादर कारव्या. विलंब शुल्कासह ११ जुलैपर्यंत सादर कारव्या. अतिविलंब शुल्कासह १५ जुलैपर्यंत सादर कारव्यात. तसेच एम. फिल., पीएच. डी. कोर्सवर्क परीक्षेला २४ जुलैपासून प्रारंभ होणार आहे, तरी इच्छुकांनी याची दखल घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ अजितसिंह यादव यांनी केले आहे.

लोकमत

# एम.फिलची २४ जुलैला कोर्सवर्क परीक्षा

कोल्हापूर : मार्च-एप्रिल २०२३ सत्रातील एम.फिल व प्री. पीएच.डी. कोर्सवर्क अभ्यासक्रमाची परीक्षा २४ जुलैला होणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने बुधवारी याचे वेळापत्रक जाहीर केले. २३ जून ते ३ जुलै या कालावधीत विद्यार्थ्यांना महाविद्यालय किंवा पदव्युत्तर अधिविभागामध्ये परीक्षेचा अर्ज भरता येणार आहे.

लोकमत

# ५,९४९ विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च- एप्रिल २०२३ उन्हाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू असून, बुधवारी एम.ए., एम.एस्सी., बी.सी.ए. यासह १९ अभ्यासक्रमांच्या परीक्षा विविध महाविद्यालयांमध्ये सुरळीत पार पडल्या. या परीक्षांसाठी ५,९४९ विद्यार्थी उपस्थित होते. परीक्षेवेळी बुधवारी कोल्हापूर जिल्ह्यात कोणत्याही गैरप्रकाराची नोंद झाली नाही.

तरुण भारत

# नवीन शैक्षणिक वर्षातील दोन्ही सत्रांच्या तारखा जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे २०२३-२४ या नवीन शैक्षणिक वर्षातील काही अभ्यासक्रमांना ३ जुलैपासून सुरूवात होणार आहे. पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या दोन्ही सत्रांच्या तारखा विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आल्या आहेत. तरी विद्यापीठ अधिविभाग, महाविद्यालये आणि विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत पदवी व पदव्युत्तर नवीन शैक्षणिक वर्षातील प्रथ व व्दितीय सत्राची सुरूवात आणि शेवटच्या तारखा जाहीर केल्या आहेत. यामध्ये कला, वाणिज्य, विज्ञान, समाजशास्त्र पदवी अभ्यासक्रम, पदव्युत्तर विद्यापीठ अधिविभाग, महाविद्यालय, कला व ललित कला, वाणिज्य व्यवस्थापन अभ्यासक्रम, व्यवस्थापन पदव्युत्तर, समाजकार्य पदवी, पदव्युत्तर, शिक्षणशास्त्र पदवी, पदव्युत्तर, विधी प्रथम वर्ष विधी पदवी, पदव्युत्तर, अभियांत्रिकी प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रम, अभियांत्रिकी व्दितीय वर्ष, तृतीय वर्ष, अंतिम वर्ष, पदव्युतर प्रथम, पदव्युतर व्दितीय वर्ष, फार्मसी पदवी प्रथम, व्दितीय, फार्मसी पदव्युतर प्रथम व व्दितीय आदी अभ्यासक्रमांच्या समावेश आहे. या सत्राची सुरूवात आणि समाप्तीचे वेळापत्रक अधिविभाग, महाविद्यलयांना ईमेलव्दारे कळवण्यात आले आहे.

15 JUN 2023
लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

केरळ-तामिळनाडू येथून येणाऱ्या लाकडाच्या वाहतुकीसोबत 'टिंबर मार्केट' परिसरात स्थलांतर

# कोल्हापुरात प्रथमच आकर्षक गोल बुबळाच्या पालीची नोंद

**संदीप आडनाईक**
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** येथील टिंबर मार्केट परिसरातून प्रथमच आकर्षक 'निमास्पीस' या प्रजातीच्या गोल बुबळाच्या पालीचा आढळ शिवाजी विद्यापीठाच्या अक्षय खांडेकर आणि इतर संशोधकांनी शोधला आहे.

यासंदर्भात 'निमास्पीस ग्रासिलीस' या गोल बुबळाच्या पालीच्या आढळ क्षेत्राची व्याप्ती आणि पुनर्वर्णन करणारा शोधनिबंध 'झूटॅक्सा' या आंतराष्ट्रीय संशोधन पत्रिकेतून प्रकाशित झाला आहे. या संशोधनात ठाकरे वाइल्डलाइफ फाउंडेशनचे अक्षय खांडेकर, तेजस ठाकरे आणि ईशान अगरवाल तसेच शिवाजी विद्यापीठाचे प्राणिशास्त्राचे प्राध्यापक सुनील गायकवाड आणि बीएनएचएसचे सौनक पाल यांचा सहभाग आहे. हा शोधनिबंध प्रा. सुनील गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या अक्षय खांडेकर यांच्या पीएचडी संशोधनाचा भाग आहे. पश्चिम घाटाला दक्षिण आणि मध्य अशा दोन भागांत खंडित करणारा 'पालघाट गॅप' हा केरळ आणि तामिळनाडू या राज्यांत पसरलेला आहे. या संशोधनामध्ये ही पाल पालघाट गॅपच्या साधारणतः ७० कि.मी. परिघात आढळून आली.

'निमास्पीस ग्रासिलीस' ही पाल तिचा नैसर्गिक अधिवास सोडून इतरत्र आढळल्याची या संशोधनात ही पहिलीच नोंद आहे. टिंबर मार्केट परिसरात ही पाल प्रथमतः विवेक कुबेर यांच्या निदर्शनास आली. केरळ-तामिळनाडू येथून येणाऱ्या लाकडाच्या वाहतुकीसोबत या परिसरात ही पाल आली असावी.



कोल्हापुरातील टिंबर मार्केट परिसरात आढळलेली 'निमास्पीस ग्रासिलीस' पाल.

'मानवी हस्तक्षेपामुळे नैसर्गिक अधिवासाच्या बाहेर होणाऱ्या प्राण्यांच्या प्रसाराचा त्या अधिवासावर आणि त्या प्राण्यांवर काय परिणाम होते हे तपासण्यासाठी दीर्घकालीन संशोधन करण्याची गरज आहे.'
- प्रा. सुनील गायकवाड.

'टिंबर मार्केट परिसरात ही पाल घरांच्या भिंती, लाकडाचे ओंडके आणि झाडांवरती आढळून आली.'
-विवेक कुबेर

'निमास्पीस ग्रासिलीस' ही पाल छोटा आकार आणि आकर्षक रंगामुळे स्पष्टपणे वेगळी ओळखता येते. या पालीचे नर माद्यांपेक्षा अधिक आकर्षक असतात. या पाली दिनचर असून दिवसा आपले भक्ष्य पकडण्यासाठी बाहेर पडतात.'
- अक्षय खांडेकर.

तरुण भारत

# बी. कॉम पेपरफुटीच्या चौकशीला सुरुवात

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत मार्च-एप्रिल २०२३ उन्हाळी सत्रातील परीक्षे दरम्यान बी.कॉम सेमिस्टर सहाचा ॲडव्हान्स अकौंटन्सीचा पेपर नंबर चार शहरातील एका नामांकित महाविद्यालयात फुटला होता. या महाविद्यालयाचे प्राचार्य, एसआरपीडी समन्वयक आणि संबंधीत कर्मचाऱ्यांच्या चौकशीला विद्यापीठाच्या परीक्षा प्रमाद समितीने

- **शिवाजी विद्यापीठ परीक्षा प्रमाद समिती करणार नियमानुसार कारवाई**
- **संबंधित महाविद्यालयातील दोषी विद्यापीठात चौकशीसाठी झाले हजर**

बुधवारी सुरुवात केली. हा पेपर कसा फुटला यासंदर्भातील सखोल चौकशी केल्यानंतर अंमित निर्णय घेऊन संबंधितांवर योग्य ती कारवाई केली जाईल.

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत परीक्षेतील बीकॉम सेमिस्टर सहाचा ॲडव्हान्स अकौंटन्सीचा पेपर नंबर चार फुटल्यानंतर विद्यापीठाने कठोर भूमिका घेत चौकशीला सुरुवात केली. दरम्यान संबंधित दोषी व्यक्तीने पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्नही केला. परंतू संबंधित महाविद्यालयाने आपल्या पातळीवर चौकशी करून संबंधित प्राध्यापक व सहाय्यकांना चौकशी कालावधीपुरते निलंब्रित केले आहे. परीक्षा प्रमाद समितीने बुधवारी संबंधीतांना चौकशीला बोलावले होते. संबंधितांची दिवसभर चौकशी सुरू होती.

नियमानुसार परीक्षा प्रमाद समिती संबंधितांची चौकशी करणार आहे. चौकशीअंती परीक्षा प्रमाद समितीचा निर्णय अंतिम असणार आहे.